जिल्हाधिकारी कार्यालय पुणे - ४११००१

E-mail Id - mahsulpune@gmail.com Ph. No. ०२०-२६११४८०४

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

(महसूल शाखा)

क्र. शिरुर/एनए/एसआर/ १६ /२०१७

पुणे दि. ३/०७/२०१८

प्रति,

तहसिलदार शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे

विषयः- जमिनीच्या रुपांतरणाबद्दल अकृषिक आकारणी व शासकीय देणी कळविणेबाबत मौजे करंदी, ता. शिरुर, जि. पुणे येथील जमीन ग.नं. ७६२ मधील एकुण ४०००.०० चौ.मी. क्षेत्रापैकी रस्त्याखालील २१४.२९ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरित ३७८५.७१ चौ.मी. क्षेत्रास वाणिज्य (हॉटेल) रेखांकन आराखडयाचे वापरास महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ क नुसार जमिनीचे रुपांतरणाबद्दल अकृषिक आकारणी व शासकीय देणी कळविण्याबाबत

संदर्भः-१) अर्जदार श्री. राजेंद्र नानासाहेब सातव, रा. मु.पो. वाघोली, ता. हवेली, जि. पुणे यांचा दि. ३०/०६/२०१८ रोजीचा अर्ज

२) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील दि.०५/०१/२०१७ रोजीची अधिसुचना

३) शासन परिपत्रक क्र.एनए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दिनांक.१९ ऑगस्ट २०१७

४) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. DP/बीएसएच/मौ. करंदी/ग.नं./स.नं. ७६२पै./प्र.क. २९/१७-१८ दिनांक २९/०६/२०१८ रोजीचे पत्र.

२/- उपरोक्त नमुद विषयान्वये, शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे, मौजे करंदी, ता. शिरुर, जि. पुणे येथील जमीन ग.नं. ७६२ मधील एकुण ४०००.०० चौ.मी. क्षेत्रापैकी रस्त्याखालील २१४.२९ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरित ३७८५.७१ चौ.मी. क्षेत्रास वाणिज्य (हॉटेल) रेखांकन आराखडयाचे वापरास जमिन अकृषिक झाल्याची नोंद संबंधित जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ सदरी घेणेबाबत अर्जदार श्री. राजेंद्र नानासाहेब सातव, रा. मु.पो. वाघोली, ता. हवेली, जि. पुणे यांनी संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये या कार्यालयाकडे विनंती अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांनी विनंती केलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे/गट/सिटी सर्व्हे नं. |
|---|---|---|---|
| १ | करंदी | शिरुर | ग.नं. ७६२ |
| अ.क्र. | जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं./गट नं. | प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी) |
| १ | राजेंद्र नानासाहेब सातव | ७६२पै. | ४०००.०० चौ.मी. |
| २ | अर्जदार यांचे नावे असलेले व मंजूरीसाठी रेखांकन नकाशात प्रस्तावित केलेले क्षेत्र | | ४०००.०० चौ. मी. |
| ३ | (-) रस्ता असल्यास क्षेत्र | | २१४.२९ चौ. मी. |
| ४ | अकृषिक आकारणीस निव्वळ क्षेत्र | | ३७८५.७१ चौ. मी. |
| ५ | वापरात बदलाचे प्रयोजन | | वाणिज्य (हॉटेल) |

३/- प्रकरणी या कार्यालयाकडील पत्र क्र. शिरुर/एनए/एसआर/१६/२०१७ दिनांक ६/११/२०१७ अन्वये अन्वये खालीलप्रमाणे अकृषिक सारा, रुपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा करणेबाबत अर्जदार यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार वरीलप्रमाणे नमुद अकृषिक सारा, रुपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबतचे चलन अर्जदार यांनी दि. १०/११/२०१७ रोजी या कार्यालयास सादर केले आहे.

४/- तसेच विषयांकीत मिळकतीवरील रेखांकन/बांधकाम नकाशास महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी त्यांचेकडील जा.क्र. DP/बीएसएच/मौ. करंदी/ग.नं./स.नं. ७६२पै./प्र.क. २९/१७-१८ दिनांक २९/०६/२०१८ अन्वये दिलेल्या प्रारंभ प्रमाणपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

सबब, आपणास या पत्रान्वये कळविणेत येते की, शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे विषयांकीत नमुद मिळकत अकृषिक झालेबाबतची योग्य ती नोंद नमुद मिळकतीचे ७/१२ सदरी घेण्याकामी फेरफार घेण्यासंदर्भात कार्यवाही करण्यास तसेच त्यानुसार गाव नमुना नं. २ अद्यावत करुन दुरुस्त अधिकार अभिलेखाची प्रत व फेरफार अर्जदारास उपलब्ध करुन देणेबाबत संबधित गांव कामगार तलाठी करंदी ता. शिरुर यांना आपले स्तरावर कळविण्यात यावे. तसेच विषयांकीत मिळकत अकृषिक झालेबाबतची नोंद नमुद मिळकतीचे ७/१२ सदरी व गाव नमुना नं. २ ला घेणेची कार्यवाही संबधित गाव कामगार तलाठी यांचे स्तरावरुन झाली किंवा कसे? याची पडताळणी आपले स्तरावरुन करणेत येऊन तद्नंतर प्रस्तुतची नोंद तालुका नमुना नं. २ ला घेणेकामी योग्य ती कार्यवाही करावी.

सोबत:- आपले कार्यालयाचे अभिलेखात जतन करणेकामी मुळ संचिका पान क्र. १ ते जोडली असे.

मा. अपर जिल्हाधिकारी सो.
यांचे मान्यतेने

सही/-xxx
(प्रल्हाद हिरामणी)
तहसिलदार महसूल
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

प्रत:- १) श्री. राजेंद्र नानासाहेब सातव,
रा. मु.पो. वाघोली, ता. हवेली, जि. पुणे

२)महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र प्राधिकरण, सयाजीराव गायकवाड, उद्योग भवन औंध पुणे-०७

३) गाव कामगार तलाठी मौजे करंदी, ता. शिरुर, जि.पुणे

४) राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११००१ यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

(प्रल्हाद हिरामणी)
तहसिलदार महसूल
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

H:\Raj Tekale N.A\PMRDA\Shirur Taluka NA\New Teepni\Karandi 762.docx